# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
**लक्ष्मी पूजनाची सभा**

प्रिय बंधू भगिनीनो / मातांनो,

वरील संस्थेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे “श्री लक्ष्मीपूजनचा” कार्यक्रम गुरवार दिनांक 03 नोव्हेंबर 1994 रोजी सायंकाळी ठीक 5:00 वाजता श्री मधूकर संभाजी राणे, अभ्युदय नगर, बिल्डींग नं. 13, काळाचौकी, मुंबई – 400 033 यांचे घरि आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून लक्ष्मीपुजनाच्या कार्यक्रमास शोभा आणावी, हि नम्र विनंती.

आपला

सुनिल सदानंद राणे
चिटणीस

विशेष सूचना
वरील संस्थेची सर्वसाधारण वार्षिक सभा दिनांक 05 फेब्रुवारी 1995 रोजी शिरोडकर हायस्कूल, परेल येथे आयोजित करण्यात आलेली आहे. कृपया सदर दिवशी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## लक्ष्मी पूजनाची सभा

**दिनांक** : गुरवार 03  नोव्हेंबर 1994
**स्थळ** : श्री मधुकर संभाजी राणे, अभ्युदय नगर, बिल्डिंग नं. 13, काळाचौकी, मुंबई – 400 013 यांचे घर

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री साबाजी त्रिंबक राणे | 10. श्री वासुदेव बाबू राणे |
| 2. श्री प्रकाश ह राणे | 11. श्री श्रीधर आत्माराम राणे |
| 3. श्री यशवंत तुकाराम राणे | 12. श्री आनंद नारायण राणे |
| 4. श्री मधुकर संभाजी राणे | 13. श्री एकनाथ अनंत राणे |
| 5. श्री सुनिल सदानंद राणे | 14. श्री अरूण राघोजी राणे |
| 6. श्री उदय भगवान राणे | 15. श्री सत्यविजय शिवराम राणे |
| 7. श्री दिलीप मधुकर राणे | 16. श्री हेमंत रमेश राणे |
| 8. श्री रमेश रघुनाथ राणे | 17. श्री अविनाश कृष्णाजी राणे |
| 9. श्री दत्ताराम विष्णु साटम | |

उपरोक्त संस्थेचे लक्ष्मीपूजन या निमित्ताने होणारी बैठक श्री मधुकर संभाजी राणे यांच्या घरी दिनांक 03 नोव्हेंबर 1994 रोजी सालाबादप्रमाणे पार पडली. या सभेस वाडीतील 17 सभासद उपस्थित होते. या सभेसाठी संस्थेचे अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे हे अनुपस्थित असल्यामुळे वयोवृध्द सभासद श्री श्रीधर आत्माराम राणे यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. या प्रसंगी अध्यक्षांच्या परवानगीने कुटूंबमालक श्री मधूकर संभाजी राणे यांना लक्ष्मीचे पूजन करण्यास विनंती करण्यात आली.

लक्ष्मीपुजनाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर वाडीतील विविध समस्याबद्दल चर्चा करण्यात आली. वाडीतील पाणीपुरवठा (नळ-पाणी योजना), रस्त्यावरील दिवे, सुधारीत चुल व श्रीक्षेत्र माडाचे पाणी येथे बंधारा इत्यादि विषयांवर चिटणीसांनी सभाग्रहास माहिती दिली. तसेच आपल्या प्राथमिक शाळेमध्ये कोबा करण्याचे काम सुरू होणार आहे असेही सभाग्रहास सांगितले.

अवांतर माहीती म्हणून अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या विषयांमध्ये श्री दत्ताराम विष्णु साटम यांनी सभाग्रहास अशी माहीती दिली की यावर्षी पिसेकामते विकास मंडळ ही संस्था नोंदणीकृत करावयाची आहे व त्यासाठी आजीव सभासद म्हणून रु.300/- वर्गणी द्यावयाची आहे. ज्या सभासदांना या संस्थेचे सभासद व्हायचे असेल त्यांनी रु.300/- भरून डिसेंबर 1994 पर्यंत आजीव सभासद व्हावे. तसेच देवळाच्या लाईट व देवाचे तरंग यावर देखील चर्चा झाली. कोणास असे तरंग द्यायची इच्छा असेल त्यांनी ते द्यावे अशी विनंती करण्यात आली.

अश्या तऱ्हेची खेळामेळीची सभा झाल्यानंतर ही सभा सायंकाळी ठीक 7:00 वाजता संपली. या प्रसंगी खोलीचे मालक श्री मधूकर संभाजी राणे यांनी चहापाण्याची योग्य व्यवस्था केली होती.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(32 to 35)

शेवटी श्री साबाजी त्रिंबक राणे यांनी उपस्थितांचे व रुम मालकांचे मन:पूर्वक आभार मानले.

---

श्री सुनिल सदानंद राणे
चिटणीस